मुंबई विद्यापीठ
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

वेबसाईट :-www.nssmu.in
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
**चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.**


पत्र.क्र.रासेयो/ईसीडी/२०२४-२५/१०८३
दिनांक : ३०.१२.२०२४

**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत मुंबई विद्यापीठ अधिनस्त सर्व महाविद्यालये.

**विषय : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० ची अंमलबजावणीच्या अनुषंगाने विद्यार्थी उपयोगी शैक्षणिक बदलांबाबत विद्यार्थ्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने स्कुल कनेक्ट २.० हे संपर्क अभियान राबविण्याबाबत.**

**संदर्भ :** उच्च व तंत्र शिक्षण, शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण - २०२४/प्र.क्र.०१/विशि-३, दिनांक २० डिसेंबर, २०२४ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० ची अमंलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून करण्यात येत आहे. उच्च शिक्षण व्यवस्थेचे संपूर्ण नूतनीकरण आणि आमूलाग्र व्यापक बदल होत असताना, त्याविषयीची जनजागृती आणि सातत्यपूर्ण समुपदेशनाची नितांत गरज लक्षात घेऊन शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये कनिष्ठ महाविद्यालयांतून इयत्ता १२ वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये त्याबाबतच्या सकारात्मक बाबी पोहोचविण्यासाठी संदर्भाधीन दि.०५.०१.२०२४ च्या शासन निर्णयान्वये सर्व अकृषि विद्यापीठस्तरावर **स्कुल कनेक्ट अभियान** राबविण्यात आले आहे.

महाविद्यालयीन राष्ट्रीय सेवा योजना एककाद्वारे नजीकच्या कनिष्ठ महाविद्यालय/शाळा यामध्ये पथनाटय/चर्चासत्र यांचे माध्यमातून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० ची अमंलबजावणी व त्या अनुषंगाने विद्यार्थी उपयोगी शैक्षणिक बदलांबाबत शालेय/कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना माहिती द्यावी व जाणिवजागृती करावी.

उच्च शिक्षण तंत्रात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२०च्या अमंलबजावणीमुळे शैक्षणिक क्षेत्रात होणा—या बदलांच्या अनुषंगाने अंमलात आणावयाच्या बाबी उपरोक्त संदर्भपत्रामध्ये विस्तृतपणे मांडण्यात आल्या आहेत, सदर संदर्भ पत्र सोबत जोडले आहे, त्याचे अवलोकन व्हावे व महाविद्यालय स्तरावर अपेक्षित असलेल्या उपक्रमाची अमंलबजावणी व योग्य ती कार्यवाही व्हावी.

हि विनंती.

आपला,

**सुशील शिंदे**
**विशेष कार्य अधिकारी, (रा.से.यो.)**

**सोबत : उपरोक्त संदर्भ पत्र.**